SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०१८-१९/ No 10751 दिनांक : 04 OCT 2018

# परिपत्रक

प्रति,
**प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**
(Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांसाठी )

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS)**
वेबपोर्टलवर सन २०१८-१९ या वर्षाची माहिती नोंदणेबाबत....

**संदर्भ : मा.डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट राज्य, पुणे यांचे क्र .उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१८-१९/१६८२३ दिनांक २७/०९/२०१८ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकित पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालयाकडून सन २०१८-१९ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित तसेच Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०१८-१९ करिता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती एमआयएस वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

सदरची माहिती दिनांक ३१/१२/२०१८ पर्यत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निशिचतपणे पुर्ण करावयाचे आहे. आपल्या महाविद्यालयांचे एमआयएस नोडल अधिकारी आपल्या महाविद्यालयांची माहिती वेबपोर्टलवर नोंद करतात सदरची माहिती वेबपोर्टलव्दारे संकलित करून मा. मंत्री महोदय व शासनाला धोरणात्मक निर्णय घेताना उपयोगी पडत असल्यामुळे आपण वेबपोर्टलवर नोंद करत असलेली माहिती बिनचुक नोंद करावयाची आहे. माहिती नोंद केल्यानंतर पत्रा सोबत जोडलेले प्रमाणपत्रावर प्राचार्याची स्वाक्षरी घेवून ते प्रमाणपत्र महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्षाकडे सादर करावयाचे आहे. तसेच एक प्रत सॉफट कॉपीव्दारे मा. शिक्षण संचालनालय, पुणे कार्यालयाच्या statcell.dhepune@nic.in या ई-मेल आयडी वरती पाठविण्यात यावी.

महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडून त्वरीत कार्यवाही करून घ्यावी. ही विनंती.

**एमआयएस वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

योजने पत्र

STAT Cell

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),**
**मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१**

कार्यालयाचे संकेतस्थळ :- www.dhepune.gov.in — कार्यालयीन ई-मेल:-stat.dhepune@nic.in
फोन क्र:- ०२०/६५००१०१६/६५००११७३/ — फॅक्स क्र:-०२०/२६१११९५३

---

क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१८-१९/16823 — दिनांक - २१.९.२०१८ 27 SEP 2018

प्रति,

१.सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे/मुंबई/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/कोल्हापूर/सोलापूर/नांदेड/जळगांव/पनवेल.

२. कुलसचिव,

१. सिंबायोसिस विश्वविदयालय, सेनापती बापट रस्ता, पुणे.
२. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड
३. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव.
४. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
५. गोखले अर्थशास्त्र संस्था, डेक्कन जिमखाना, पुणे
६. टिळक महाराष्ट्र विदयापीठ, गुलटेकडी, पुणे
७. भारती विदयापीठ, पुणे
८. शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर
९. कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविदयालय, रामटेक जि.नागपूर
१०. सोलापूर विदयापीठ, सोलापूर
११. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद
१२. संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती
१३. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ, मुंबई
१४. डेक्कन अभिमत विदयापीठ, येरवडा, पुणे
१५. मुंबई विदयापीठ, मुंबई
१६. सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे
१७. गोंडवाना विदयापीठ, गडचिरोली
१८. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
१९. नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, मुंबई
२०. नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, औरंगाबाद
२१. नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, नागपूर.
२२. अंजिक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ,पुणे.

...कोल्हापूर
1 - OCT 2018
243

**विषय - माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) वेबपोर्टलवर सन २०१८-१९ या वर्षाची माहिती नोंदणे बाबत.**

उच्च शिक्षण संचालनालयाने www.dhemis.maharashtra.gov.in हे एमआयएस माहिती नोंदणीचे वेबपोर्टल विकसित केले आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालये सन २०१३-१४ पासून हया वेबपोर्टलवर ऑनलाईन पध्दतीनुसार प्रत्येक वर्षाकरीता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती नोंदवित आहेत हे आपणांस विदित आहेच.

२. संचालनालयाकडुन सन २०१८-१९ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक वरील वेबपोर्टलवर दि.१.१०.२०१८ पासुन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या अनुषंगाने सहसंचालक कार्यालये, सर्व अकृषी विदयापीठे आणि संलग्नित सर्व महाविदयालयांनी दिनांक ३०.९.२०१८ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे. **माहिती नोंदणीचे काम सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालयांनी दिनांक ३१.१२.२०१८ अखेर निश्चितपणे पूर्ण करावयाचे आहे.** त्यानंतर नोंदलेल्या माहितीची वैधता पडताळणी करुन व आवश्यक तेथे दुरुस्त्या करुन माहिती नोंदणीचे सर्व काम दिनांक ३१.१.२०१९ अखेर पूर्ण करावयाचे आहे. सन २०१८-१९ च्या माहिती नोंदणीच्या कामाचा अहवाल दिनांक ५.२.२०१९ पर्यंत संचालनालयाकडुन शासनाला सादर करावयाचा असल्याने वरील माहिती नोंदणीचे काम विहित वेळेत पूर्ण होईल यादृष्टीने सर्व सहसंचालक कार्यालये व विदयापीठांनी कामाचे संनियंत्रण करावे.

(क्रमशः)

३.	सहसंचालक कार्यालयांचे, विभागातील अनुदानित महाविदयालयांवर थेट नियंत्रण असल्यामुळे त्यांनी आपल्या विभागातील अनुदानित महाविदयालयांच्या आणि आपल्या सहसंचालक कार्यालयाच्या एमआयएस माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांनी आपल्या विदयापीठातील नियुक्त करण्यात आलेल्या एमआयएस नोडल अधिका-यांकडुन आपल्या विदयापीठाचे माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांशी संलग्नित असलेल्या महाविदयालयातील माहिती नोंदणीबाबत विदयापीठस्तरावरुन स्वतंत्र पत्र, ई-मेल, दूरध्वनीव्दारे संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे आणि काम पूर्ण करुन घेण्यात यावे.

४. **वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांकरीता -**

सन २०१८-१९ हया वर्षात विदयापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या तथापि एमआयएस वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांची नोंदणी वेबपोर्टलवर करुन घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित महाविदयालयांशी पत्र व दूरध्वनीव्दारे संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करण्यात यावी. तसेच सन २०१८-१९ यावर्षात बंद असलेली अथवा असंलग्नित असलेली (De-affiliate) महाविदयालयांची यादी संचालनालयास सादर करण्यात यावी. सदरील महाविदयालये सिस्टिममधून डिॲफिलिट करण्यात येतील ज्यामुळे संबंधित महाविदयालयांकडे माहिती भरण्याबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. **महाविदयालयांची माहिती प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र देणेबाबत -**

सर्व महाविदयालयांकडुन वेबपोर्टलवर अचूक व वैध माहिती विहित मुदतीत नोंदवून घेण्याकरीता विदयापीठामार्फत संनियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. **या अनुषंगाने एमआयएस वेबपोर्टलवर माहिती भरलेल्या महाविदयालयांचीच कामे (उदा. संलग्नीकरण, परीक्षानिकाल व अनुषंगिक कामे) विदयापीठातील इतर शाखा/विभागामार्फत पुढील कार्यवाहीकरीता स्विकारली जावीत.** याबाबत संबधित शाखेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे. याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

महाविदयालयांनी सन २०१८-१९ ची माहिती व्यवस्थितरित्या नोंदल्याचे तसेच ती पडताळून बरोबर असल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांकडुन घेण्यात यावे. सदरील प्रमाणपत्राची एक प्रत संचालनालयास वरील ई-मेलव्दारे सादर करण्यात यावी. **महाविदयालयांकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांनी संबंधित महाविदयालयास सन २०१८-१९ च्या माहिती नोंदणीचे काम पूर्ण केल्याबाबतचे आणि महाविदयालयाची विदयापीठातील इतर शाखा/विभागांशी संबंधित असलेली अथवा वर नमूद केलेली कामे स्विकारण्यास हरकत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र दयावे.**

**विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांचे माहिती नोंदणीचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाने सादर केल्यानंतर विदयापीठातील इतर शाखा/विभाग यांचेकडुन संबंधित महाविदयालयाची वर नमूद केलेली कामे पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावीत.** ज्यामुळे महाविदयालयांकडुन केल्या जाणा-या माहिती नोंदणीच्या कामावर योग्य संनियंत्रण राखणे शक्य होईल. वरील दोन्ही प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

**(डॉ.धनराज माने)**
**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

(महाविद्यालयाने द्यावयाचे प्रमाणपत्र)

# -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस.) सन २०१८-१९ या वेबपोर्टलवर ............................................................................................................................................................................................................................................हया महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

दिनांक : / /२०१ स्वाक्षरी :

ठिकाण : प्राचार्याचे नाव :

संस्थेचे नाव :

शिक्का :